सं.फौ.ख.क्र.२०३/२०२४

शोभाबाई उबाळे वि. संतोष गायकवाड

**निशाणी –४**

**शपथेवर पडताळणी**

माझे नांवः शोभाबाई संजय उबाळे,

वयः ४० वर्षे, धंदाः शेती,

रा. गणोरी, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.

शपथेवर सुरु,

मी सदरची तक्रार संतोष गायकवाड, शिला गायकवाड आणि नाना गायकवाड यांच्याविरुध्द दाखल केली आहे. आम्ही गणोरी येथे शेतवस्तीत राहतो. दि.२४.०१.२०२४ रोजी रात्री साडेसात वाजता मी एकटी शेतात माझ्या वडीलांकडे जात होते. त्यावेळी सर्व आरोपी यांनी मला पाहिल्यावर ते माझ्या पाठी पळाले व त्यांनी मिळुन मला धरले व धमकवले की, "तु येथून कशी येते, पुन्हा येथे आलीस तर तुला जिवे मारुन टाकु, तुझ्या वडीलांकडे तु कशी राहते, ते आम्ही पाहतो." तिन्ही आरोपींनी मिळुन मला लाथाबुक्यांनी मारहाण केली व मला खाली पाडले. त्यांनी माझ्या तोंडावर, नाकावर, पोटावर आणि छातीवर लाथाबुक्यांनी मारहाण केली, ज्यामुळे मी बेशुध्द झाले. त्यानंतर गावातील लोकं तेथे गोळा झाले व त्यांनी मला गाडीत टाकुन फुलंब्री पोलीस ठाणे येथे आणले. पोलीसांनी मला सरकारी दवाखान्यात वैद्यकीय उपचारकामी पाठविले. मी सरकारी दवाखाना, फुलंब्री येथे गेले असता तेथे मला उलट्या होऊ लागल्या, ज्यामुळे तेथील डॉक्टरांनी मला घाटी दवाखाना, औरंगाबाद येथे पाठविले. तेथे माझ्यावर वैद्यकीय उपचार झाला व त्यानंतर मी फुलंब्री पोलीस ठाणे येथे येऊन आरोपींविरुध्द तक्रार नोंदविली. पोलीसांनी माझी तक्रार नोंदवुन घेतली परंतु त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे मी न्यायालयात सदरची फिर्याद दाखल केली.

S.S. Ubale
तक्रारदाराची सही/अंगठा

04/05/2024
**(व्ही. जे. घाडीगांवकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फुलंब्री**
**दि.०४.०५.२०२४**